॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

✲ सुविचार ✲

जिथे जिद्द असते,
तिथे यशाचा मार्ग नक्की सापडतो.

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. १६ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

## SPOT NEWS

### एलसीबीची जबाबदारी संतोष मुटकुळे यांचेकडे

● **अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेच्या निरीक्षकपदाचा पदभार अखेर संतोष मुटकुळे यांच्याकडे देण्यात आला आहे. मुटकुळे शेवगाव पोलिस ठाण्यात कार्यरत होते. त्यापूर्वी त्यांनी पाथर्डी, तसेच नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे निरीक्षक पदावर काम केलेले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा अनुभव पाहून त्यांना स्थानिक गुन्हे शाखेची जबाबदारी देण्यात आली आहे. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी त्यांच्या नियुक्तीचा आदेश काढला आहे. पोलिस अधीक्षक सुदर्शन यांनी मागील आठवड्यात जिल्हाभरातील १९ पोलिस अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या केल्या. त्यात स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांचा देखील समावेश आहे. कबाडी यांची शिर्डी येथे साई संस्थानच्या सुरक्षा विभागात बदल करण्यात आली. त्यामुळे या रिक्त जागेवर कुणाची वर्णी लागणार याकडे पोलिस दलातील सर्वांच्याच नजरा लागल्या होत्या. कबाडी यांच्या बदलीनंतर स्थानिक गुन्हे शाखेतील सहायक निरीक्षक हरिष भोये यांच्याकडे तात्पुरता पदभार देण्यात आला होता. त्यानंतर अधीक्षक सुदर्शन यांनी आज या रिक्त जागेवर मुटकुळे यांची नियुक्ती केली. तसे आदेश त्यांनी काढले आहेत. मुटकुळे अनुभवी अधिकारी आहेत. त्यांनी लावलेला आहे. अधिक गुंतागुंतीच्या गुन्ह्यांचा तपास

### २२ जूनपासून राज्याचे पावसाळी अधिवेशन

● **मुंबई –** महाराष्ट्र विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनाचे सविस्तर वेळापत्रक ठरवण्यासाठी आज मुंबईत पार पडलेली 'कामकाज सल्लागार समितीची' महत्त्वाची बैठक आता संपली आहे. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, राज्याचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत होणार आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, आगामी पावसाळी अधिवेशनाचे कामकाज एकूण तीन आठवडे चालणार आहे. या तीन आठवड्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयके, जनहिताचे प्रश्न आणि शासकीय कामकाज पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### ५ महिन्यांनंतर भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे दर्शन सुरू

● **पुणे –** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर मंदिराचे दरवाजे तब्बल पाच महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर पुन्हा एकदा भाविकांसाठी खुले करण्यात आले आहेत. मंदिर प्रशासनाच्या निर्णयामुळे राज्यभरातील शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने काही नवीन नियम लागू केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मंदिर परिसरातील दुरुस्ती, संवर्धन आणि सुरक्षाविषयक कामांमुळे दर्शन व्यवस्था काही काळासाठी मर्यादित करण्यात आली होती. आता ही कामे पूर्ण झाल्यानंतर भाविकांना नियमित दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# पाण्याचे काटेकोर नियोजन करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । पाणीसाठा आरक्षण व कृषी नियोजनाबाबत आढावा बैठक

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

'एल-निनो'च्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणारी परिस्थिती लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करावे. शासनाच्या २०१८ च्या निर्णयानुसार पिण्याच्या पाण्याचे आरक्षण प्राधान्याने राखून कालवे व बॅकवॉटर क्षेत्रातील अनधिकृत पाणी उपसा तात्काळ थांबवावा. आवश्यकतेनुसार अशा ठिकाणांवरील वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात 'एल-निनो'चा संभाव्य प्रभाव, पाणीसाठा आरक्षण व कृषी विभागाच्या उपाययोजनांबाबत आयोजित तातडीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, नगरपालिका प्रशासन अधिकारी डॉ.प्रदीप पठारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.विरेंद्र बडदे, नायब तहसीलदार भारती घोरपडे तसेच कृषी, जलसंपदा, महापालिका व महसूल विभागांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन शेतीसाठी देण्यात येणारे पाणी आवर्तन तात्काळ बंद करण्यात यावे. जलसंपदा विभागाने पाणीचोरी रोखण्यासाठी तात्काळ भरारी पथके नियुक्त करावीत. कालवे व बॅकवॉटर क्षेत्रात सुरू असलेला अनधिकृत पाणी उपसा त्वरित बंद करावा. आवश्यकतेनुसार संबंधित विद्युत वितरण केंद्रे बंद करून वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

महापालिका, नगरपालिकांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण भागात उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. स्थानिक परिस्थितीनुसार नागरिकांना दैनंदिन किंवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याबाबत निर्णय घ्यावा. तसेच जलसंपदा विभागाच्या मुख्य व कार्यकारी अभियंत्यांनी विद्यमान पाणीसाठ्याची स्थिती तपासून पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी सविस्तर नियोजन आराखडा तातडीने सादर करावा, असे त्यांनी सांगितले.

कालव्यांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करताना मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्यास अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे अधिक किफायतशीर व पाणी बचतीचे ठरत असेल, तर त्या पर्यायाची तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर तपासणी करावी, असे निर्देशही श्री.आशिया यांनी बैठकीत दिले.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीबाबत योग्य मार्गदर्शन करावे. जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्याशिवाय व समाधानकारक पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे. उतारावर आडवी पेरणी करण्याबाबत जनजागृती करावी. जिल्ह्यात खते व बियाण्यांची पुरेशी उपलब्धता आहे. मात्र खतांचा काळाबाजार, लिंकिंग तर होत नाही ना याची कृषी विभागाने भरारी पथकांच्या माध्यमातून तपासणी करावी. खत व बियाणे पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी आणि 'डिजिटल पीक पाहणी' मोहीम तातडीने पूर्ण करावी, अशा सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या.

जिल्ह्यात सुरू असलेली जलसंधारणाची कामे, गाळ काढण्याची कामे व इतर पाणी साठवण क्षमतेत वाढ करणारी कामे जलद गतीने पूर्ण करावीत, जेणेकरून उपलब्ध पावसाच्या पाण्याचा जास्तीत जास्त साठा निर्माण करता येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी सांगितले.

# आरटीआय कार्यकर्ता देशातील नवा व्यवसाय बनलाय

## खंडपीठातील न्यायाधिशांची टिप्पणी

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

रस्ता बांधकामाच्या कामात सरकारी कर्मचाऱ्याला अडथळा आणल्याचा आरोप असलेल्या एका माहिती अधिकार कार्यकर्त्याचा अटकपूर्व जामीन सर्वोच्च न्यायालयाने सोमवार दि. १५ मे फेटाळला. हा जामीन फेटाळताना, माहिती अधिकार कार्यकर्ता असणे हा आता एक नवा व्यवसाय बनला आहे अशी तोंडी टिप्पणी न्यायालयाने केली.

खंडपीठातील न्यायमूर्ती मेहता म्हणाले आरटीआय कार्यकर्ते असणे हा आता एक नवा व्यवसाय झाला आहे. केंद्र सरकारने निधी दिला आहे, रस्ता बांधकामाची काळजी सरकार घेईल. तुम्ही कोणीही नाही आहात. कसले हे तथाकथित आरटीआय कार्यकर्ते! हे म्हणजे यलो जर्नलिझम (पित्त पत्रकारिता) आहे. अर्ज फेटाळण्यात येत आहे.

न्यायमूर्ती बिश्नोई यांनी देखील बेहल यांच्या रस्ता बांधकामाच्या देखरेखीवर (मॉनिटरिंग) प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले या सर्व रस्त्यांच्या कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही कोणी वरिष्ठ अधिकारी आहात का? असा सवाल त्यांनी केला. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि त्याच्या एका साथीदारावर चालू असलेल्या रस्ता बांधकामाच्या कामात अडथळा आणल्याचा आरोप आहे. काम करून घेणा-या पर्यवेक्षकाला (सुपरवायझर) आणि मजुरांना धमकावले होते.

सुपरवायझरला मारहाण केली आणि त्याच्या साथीदाराने लाथा बुक्क्यांनी मारले, असाही त्यांच्यावर आरोप आहे. यासोबतच त्यांनी तिथे काम करणा-या मजुरांना जातीवाचक शिवीगाळ केली. या सर्व प्रकारानंतर त्यांच्यावर नवीन कायद्यानुसार (भारतीय न्याय संहिता) मारहाण व सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल, तसेच ॲट्रॉसिटी कायद्या'अंतर्गत (अनुसूचित जाती-जमाती छळ प्रतिबंधक कायदा) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर माहिती अधिकार कार्यकर्ते राकेश कुमार बेहल यांनी जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

# राजूरच्या सरपंचपदावरुन पुष्पा निगळे यांची हकालपट्टी

## भ्रष्टाचाराच्या आरोपावर विभागीय आयुक्तांची कारवाई । अकोलेच्या राजकारणात खळबळ

● **अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या राजूर ग्रामपंचायतीच्या सरपंच पुष्पा निगळे यांची भ्रष्टाचाराच्या आरोपांप्रकरणी हकालपट्टी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिलेल्या आदेशानुसार, पुष्पा निगळे यांना ग्रामपंचायतीच्या विद्यमान कार्यकाळासाठी सरपंच तसेच सदस्य पदावरून काढून टाकण्यात आले आहे.

राजूर हे विद्यमान आमदार डॉ. किरण लहामटे तसेच माजी आमदार वैभव पिचड यांचे गाव म्हणून राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे मानले जाते. चार वर्षांपूर्वी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) समर्थित पुष्पा निगळे यांनी भाजप समर्थित शोभा देशमुख यांचा अवघ्या १९ मतांनी पराभव करत विजय मिळविला होता. या विजयामुळे पिचड गटाची राजूर ग्रामपंचायतीवरील अनेक वर्षांची मक्तेदारी संपुष्टात आली होती. मात्र, आता भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे त्यांना पद गमवावे लागल्याने हा आमदार लहामटे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या गावातील सरपंचाला भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून पद गमवावे लागण्याची तालुक्यातील ही पहिलीच घटना ठरली आहे.

सरपंच निगळे यांचा कारभार सुरुवातीपासूनच वादग्रस्त ठरत आला होता. त्यांच्याविरोधात वेळोवेळी विविध आरोप झाले होते. शिवसेना (ठाकरे गट)चे संतोष मुतडक यांनी माहितीच्या अधिकारातून ग्रामपंचायतीच्या कथित गैरकारभारासंदर्भात माहिती गोळा करून भ्रष्टाचाराबाबत तक्रार दाखल केली होती.

या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमून प्रकरणाची चौकशी केली. चौकशी अहवालाच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांकडे सरपंच निगळे यांच्याविरुद्ध अपात्रतेची कारवाई करण्याची शिफारस केली होती.

ग्रामनिधी, १५ वा वित्त आयोग निधी, पाणीपुरवठा योजना आणि पाच टक्के पेसा योजनेतील विकासकामांच्या खर्चात कथित अनियमितता व अपहार झाल्याचे आरोप या प्रकरणात करण्यात आले होते. या प्रकरणाची अंतिम सुनावणी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्यासमोर झाली.

विविध योजनांमधील अनियमितता आणि कथित अपहाराची संशयित रक्कम १ कोटी २ लाख ३९ हजार १३६ रुपये, तर कायमस्वरूपी अपहाराची रक्कम १२ लाख ५० हजार ४१५ रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारे एकूण १ कोटी १४ लाख ८९ हजार ५५१ रुपयांच्या आर्थिक अनियमिततेचा ठपका ठेवण्यात आला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या प्रस्तावानुसार, कायमस्वरूपी व संशयित अपहारास सरपंच पुष्पा निगळे जबाबदार असून, त्यांनी कर्तव्य पार पाडताना गैरवर्तणूक केली तसेच सरपंच पदाच्या जबाबदाऱ्यांकडे दुराग्रहाने दुर्लक्ष केल्याचे विभागीय आयुक्तांनी आपल्या आदेशात नमूद केले आहे. त्यामुळे त्यांना सरपंच तसेच सदस्य पदावरून हटविण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयामुळे अकोले तालुक्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, राजूर ग्रामपंचायतीच्या राजकारणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# जप्त गुटखा पुन्हा बाजारात आल्याचा आरोप; श्रीगोंदा पोलिसांविरोधात चौकशीची मागणी

## दोषींवर गुन्हा दाखल करण्याची टिळक भोस यांची मागणी

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील सीआर क्रमांक ४६३/२६ मधील जप्त करण्यात आलेला गुटखा पुन्हा बाजारात आढळून आल्याचा दावा करण्यात आल्याने पोलीस प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात श्रीगोंदा पोलीस निरीक्षक किरण शिंदे व इतर कर्मचाऱ्यांवर जप्त मुद्देमाल चोरून विकल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, संबंधितांवर चोरीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी स्वराज्य जनजागृती परिषदेचे जिल्हाध्यक्ष टिळक गोपीनाथ भोस यांनी केली आहे.





यासंदर्भात पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक (नाशिक परिक्षेत्र) तसेच अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, १५ मे २०२६ रोजी बेलवंडी पोलिसांनी छापा टाकून सुमारे ४ लाख ६० हजार रुपयांचा गुटखा जप्त केला होता. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात सीआर क्रमांक ४६३/२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, १४ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेने श्रीगोंदा शहरात टाकलेल्या छाप्यात जप्त करण्यात आलेल्या गुटख्याच्या पॅकिंगवर ४६३/२६ असा स्पष्ट उल्लेख आढळून आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे पूर्वी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पुन्हा बाजारात कसा पोहोचला, याबाबत गंभीर संशय व्यक्त करण्यात येत आहे.

जप्त मुद्देमाल सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर असताना हा प्रकार घडल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताची शक्यता नाकारता येत नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

टिळक भोस यांनी या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली असून, जप्त गुटखा पुन्हा बाजारात कसा आला याची सखोल तपासणी करण्यात यावी, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करून दोषींवर निलंबनासह कठोर कारवाई करावी, तसेच गुटखा चोरीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे.

जप्त मुद्देमाल व्यवस्थापनातील भ्रष्टाचार व संगनमत उघड करून जनतेसमोर सत्य आणावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली असून, या प्रकारामुळे पोलीस प्रशासनावरील जनतेचा विश्वास डळमळीत होत असल्याचे भोस यांनी म्हटले आहे.

या प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास २६ जून २०२६ रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# कामगारांच्या हक्कांसाठी सह्याद्री छावा संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

## 'समान काम, समान वेतन'ची अंमलबजावणी करण्याची मागणी; कामगार कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर कारवाईचा आग्रह

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर शहरातील कामगारांची आर्थिक लूट व पिळवणूक होत असताना संबंधित यंत्रणा मात्र त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्यात आले. कामगार कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर तातडीने कारवाई करून कामगारांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण मिळावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

या उपोषणात अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, दत्ता वामन, श्रीधर शेलार, विजय वहाडणे, सुभाष काकडे, बबन शिंदे, बाजीराव कलढोणे, राजकुमार पासवान, हरीओम राजपूत, संदीप राजपूत, महेश गुंजकर, राम भोर, अरविंद चौधरी, शंभू यादव, दिनेश यादव, कृष्णा कुमार, चंद्रकांत मगर, कैलास शर्मा, सुधाकर यादव, रवींद्र राजपूत, अरविंद राजपूत यांच्यासह मोठ्या संख्येने कामगार सहभागी झाले होते.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी आरोप केला की, शहरातील अनेक उद्योग व कंपन्यांमध्ये कामगारांचे विविध प्रकारे शोषण केले जात असून त्यांची आर्थिक पिळवणूक सुरू आहे. मात्र, या गंभीर बाबींकडे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी व निवेदने सादर करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. उलट जबाबदारीची टाळाटाळ करून कारवाईसाठी दिरंगाई केली जात असल्याचा आरोप संघटनेने केला.

संघटनेच्या वतीने कायनेटिक इंजिनिअरिंग कंपनी युनिट-२ आणि एक्साइड बॅटरी या कंपन्यांविरोधात तक्रारी दाखल करण्यात आल्याचेही आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या कंपन्यांमध्ये कामगार कायद्यांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करत त्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

उत्पादन प्रक्रियेत कायमस्वरूपी कामगार आणि कंत्राटी कामगार एकाच प्रकारचे काम करत असतानाही त्यांच्या वेतनामध्ये मोठी तफावत आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'समान काम, समान वेतन' या तत्त्वाची स्पष्टपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिलेले असतानाही अनेक कंपन्यांमध्ये या आदेशाचे पालन केले जात नाही. त्यामुळे समान स्वरूपाचे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांप्रमाणेच वेतन मिळावे, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे.



याशिवाय कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी (पीएफ) संदर्भातील नियमांचे काटेकोर पालन करण्यात यावे, त्यांच्या वेतनातून होणाऱ्या कपातींबाबत पारदर्शकता ठेवावी तसेच सर्व कामगारांना कायदेशीर हक्क व सामाजिक सुरक्षा लाभ मिळावेत, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली.

## SPOT NEWS



## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन केला 'प्रवेश महोत्सव'

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या रिमांड होम केंद्रांतर्गत एका विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेद्वारे केंद्र स्तर शिक्षकांनी व मार्कंडेय माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक यांनी थेट विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचून प्रवेश महोत्सव साजरा केला, तसेच शाळेत नवीन प्रवेश देखील निश्चित केले. रिमांड होम केंद्रातील केंद्र स्तर विशेष शिक्षक उमेश शिंदे, रामेश्वर ढगे, मार्कंडेय माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक संदीप छिंदम, निलेश आनंदास यांनी एका दिव्यांग विद्यार्थ्याच्या घरी जाऊन त्याचे पुष्पगुच्छ देऊन अत्यंत उत्साहात स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्याची भेट देण्यात आली. केंद्र स्तर विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी या मुलाशी आपुलकीने संवाद साधला. तसेच पालकांशी चर्चा करताना त्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांचे योग्य समुपदेशन केले व शासनाकडून मिळणाऱ्या विविध सोयी-सुविधांची सविस्तर माहिती दिली. मुख्याध्यापक संदीप छिंदम यांनी पालकांना आपल्या पाल्याला नियमित शाळेत पाठवण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले. रिमांड होम केंद्रातील दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी विशेष शिक्षक उमेश शिंदे आणि रामेश्वर ढगे यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांतून काही दिव्यांग विद्यार्थ्यांचे 'शारदा विद्या मंदिर' मध्ये यशस्वीरित्या प्रवेश करण्यात आले. शाळेत प्रवेशावेळी मुख्याध्यापिका भक्ती पुराणिक यांनी या सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत केले. तसेच विद्यार्थ्यांचा पुढील अभ्यासक्रम सुकर व्हावा याकरिता त्यांना शाळेच्या वतीने पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

## भिंगारला पहिल्यांदाच महिला एपीआय; गुन्हेगारी रोखण्याचे आव्हान

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

तेजश्री थोरात यांनी भिंगार पोलीस स्टेशन येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर भिंगार शहराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खात्याचे चेअरमन भाऊ कर्डिले, दरेवाडीचे सरपंच अनिल करंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. भिंगार शहरात महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून तेजश्री थोरात यांची नियुक्ती झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. शहरात वाढत असलेली गुन्हेगारी, अवैध धंदे तसेच महिलांशी संबंधित गुन्ह्यांवर प्रभावी कारवाई होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. यावेळी भाऊ कर्डिले म्हणाले की, भिंगार शहरात तेजश्री थोरात यांची सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती होणे ही शहरासाठी सकारात्मक बाब आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अवैध व्यवसाय, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि महिलांच्या छेडछाडीच्या घटनांवर निश्चितपणे आळा बसेल. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पोलीस प्रशासन अधिक सक्षमपणे कार्य करेल, असा विश्वास आहे. भिंगार परिसरात अवैध धंदे, वाहतूक नियमांचे उल्लंघन, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित प्रश्न आणि वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडून अधिक कडक उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. नव्याने रुजू झालेल्या महिला अधिकाऱ्यांमुळे कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होण्याची अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

## फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब ठरला अहिल्यानगर प्रीमियरचा चॅम्पियन

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

अशोकभाऊ फिरोदिया स्कूल मैदानावर झालेल्या अहिल्यानगर प्रीमियर फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब संघाने सुमन फुटबॉल क्लबचा २-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. सामन्याच्या सुरुवातीलाच फिरोदिया शिवाजियन्सने आक्रमक खेळ करत आघाडी घेतली. अभय साळवे आणि मयूर गोरखा यांनी प्रत्येकी १ गोल करत संघाला २-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. सुमन एफसीच्या अविनाश शिंदे याने १ गोल करून फरक कमी केला, मात्र फिरोदिया शिवाजियन्सने आघाडी कायम राखत २-१ असा विजय मिळवला. नमोह एफसी आयोजित या स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स एफसीने स्पर्धेतील सर्व ४ सामने जिंकत अजिंक्य राहून विजेतेपद संपादन केले. संघाच्या शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळामुळे त्यांना या यशावर शिक्कामोर्तब करता आले.

### राशीन येथील विष्णू मंदिरातील १८०९ मधील

# शिलालेखाने उलगडला शेटे घराण्याचा इतिहास

**अकापा शेटे यांच्या धार्मिक निष्ठेची नोंद । स्थानिक इतिहास, वंशपरंपरा व सामाजिक जीवनाचा महत्त्वपूर्ण पुरावा**

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील राशीन येथील श्री विष्णू मंदिराच्या सभामंडपाच्या दर्शनी खांबावरील शिलालेखातून शेटे घराण्याच्या इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा समोर आला आहे. देवनागरी लिपीतील मराठी भाषेतील हा आठ ओळींचा उठावदार शिलालेख शालिवाहन शके १७३१ अर्थात इ.स. १८०९ मधील असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सदर शिलालेख मंदिराच्या दर्शनी खांबाच्या वरच्या मध्यभागी कोरलेला असून अनेक वर्षे उघड्यावर असतानाही त्यावर वातावरणाचा विशेष परिणाम झालेला नाही. अक्षरांची रचना रेखीव व एकसारखी असून, जागेअभावी काही अक्षरे संक्षिप्त स्वरूपात वापरण्यात आली आहेत. अक्षरांना रंग दिल्यामुळे मजकूर स्पष्टपणे वाचता येतो.

शिलालेखाचे वाचन इतिहास अभ्यासक अनिल किसन दुधाणे आणि अनिकेत रजपूत यांनी केले आहे.

**शिलालेखातील मजकूर**

**१. ॥ श्री ॥**
**२. ॥ लक्ष्मीकांत**
**३. चरणी तत्पर भु**
**४. जग सुत अका**
**५. पा शेटे राशिन क**
**६. र कसबे म. निरं**
**७. तर शके १७३१ श्रु**
**८. क्ल ना. अश्विन शुद्ध १०**

**शिलालेखाचा अर्थ**

श्री लक्ष्मीकांताच्या चरणी सदैव तत्पर असलेले राशीन कसब्यातील भुजंग यांचे पुत्र अकापा शेटे यांनी शालिवाहन शके १७३१, शुक्ल नाम संवत्सर, अश्विन शुद्ध दशमी अर्थात १८ ऑक्टोबर १८०९ (विजयादशमी, बुधवार) रोजी या मंदिराचे बांधकाम पूर्ण केल्याची नोंद या शिलालेखात करण्यात आली आहे.

**शिलालेखाचे ऐतिहासिक महत्त्व**

या शिलालेखामुळे राशीन येथील शेटे घराण्याचा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध झाला आहे. लक्ष्मीकांत चरणी तत्पर या उल्लेखावरून अकापा शेटे यांची वैष्णव भक्ती आणि मंदिराशी असलेली निष्ठा अधोरेखित होते. भुजंग सुत अकापा शेटे या उल्लेखातून त्यांच्या वंशपरंपरेची माहिती मिळते, तर कसबे राशीन या उल्लेखावरून त्या काळातील राशीनचे प्रशासकीय व व्यापारी महत्त्व स्पष्ट होते.

शके १७३१ म्हणजेच इ.स. १८०९ ही निश्चित कालनोंद उपलब्ध होत असल्याने हा शिलालेख स्थानिक इतिहासाच्या कालक्रमासाठी उपयुक्त ठरत आहे. अशा नोंदींमधून त्या काळातील प्रतिष्ठित व्यापारी, मंदिरसेवक व समाजातील प्रभावी घटकांची माहिती मिळते. धार्मिक श्रद्धा, सामाजिक प्रतिष्ठा आणि स्थानिक समाजरचनेच्या अभ्यासासाठी हा शिलालेख महत्त्वाचा स्रोत मानला जात आहे.

**राशीनमधील शेटे घराण्याची ऐतिहासिक परंपरा**

राशीन येथील जगदंबा मंदिर, विष्णू मंदिर, काशी विश्वनाथ मंदिर तसेच बारव येथेही शेटे परिवारातील भुजंग अप्पा शेटे, महादपा शेटे आणि सदाशिव शेटे यांचा उल्लेख असलेले शिलालेख आढळतात. या कुटुंबाने कसबे राशीनमध्ये धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्य उभारून मंदिरे, बारवा आणि वाड्यांच्या माध्यमातून आपल्या घराण्याची स्मृती जपली असल्याचे दिसून येते.

या शिलालेखाच्या शोधकार्य, छायाचित्रण व ठसे घेण्याच्या कामासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचालित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीचे राजेश इंगळे, दिगंबर भुजबळ, सचिन भोसले तसेच शेटे परिवार यांचे सहकार्य लाभल्याची माहिती देण्यात आली आहे.



## एससी आरक्षणातील उपवर्गीकरण तात्काळ थांबवावे

**सुपा येथे लाँग मार्चचे भव्य स्वागत । पारनेरमधील बैठकीत आक्रमक भूमिका**

● **पारनेर । वीरभूमी –**

अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करून समाजात तेढ निर्माण करण्याचा आणि पर्यायाने आरक्षण संपविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत ही प्रक्रिया तात्काळ थांबवावी, असा आक्रमक ठराव पारनेर येथे झालेल्या बैठकीत सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

बैठकीत आरक्षण हा संविधानाने प्रदान केलेला मूलभूत अधिकार असून, त्यात फेरबदल करण्याचा अधिकार राज्य सरकार किंवा न्यायालयाला नसल्याचे मत व्यक्त करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या उपवर्गीकरणाच्या निर्णयाला संविधानविरोधी आणि घटनाबाह्य ठरवत, या निर्णयाविरोधात राज्यभर तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात बीड ते मंत्रालय, मुंबई असा पायी लाँग मार्च काढण्यात येत आहे. हा लाँग मार्च मंगळवार, १६ जून




रोजी पारनेर तालुक्यातील सुपा येथे पोहोचणार असून, आंबेडकरी चळवळीतील विविध पक्ष, संघटना आणि नागरिकांच्या वतीने त्याचे जंगी स्वागत करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

जोपर्यंत सरकार उपवर्गीकरणाची प्रक्रिया थांबवत नाही, तोपर्यंत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनाच्या नियोजनासाठी 'सर्वसमावेशक अनुसूचित जाती-जमाती एकता समिती'ची स्थापना करण्यात आली. समितीच्या प्रमुखपदी तसेच स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ कार्यकर्ते बाळासाहेब पातारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

लाँग मार्चच्या स्वागतासाठी तसेच त्यानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या प्रबोधन संमेलनासाठी तालुक्यातील संविधानप्रेमी आणि आंबेडकरवादी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या बैठकीस राजेंद्र करंदीकर, बाळासाहेब पातारे, दादाभाऊ पटेकर, हिरामण सोनवणे, पत्रकार भगवान गायकवाड, किरण सोनवणे, प्रदीप नगरे, योगेश सोनवणे, अमित जाधव, अतुल भालेराव यांच्यासह नगर शहरातील ज्येष्ठ कार्यकर्ते संजय कांबळे, शिवाजी भोसले, योगेश साठे, महेंद्र बोरुडे, चंद्रकांत गायकवाड, सुरेश जाधव, सतिश सूर्यवंशी, प्रदीप कसबे, सुखदेव थोरात, रामदास कसबे, बाळासाहेब कांबळे, अजय साळवे, सुधीर सोनवणे, धनाजी सूर्यवंशी, संतोष आडसुळ, राहुल घंगाळे आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## धान्य वितरणास जूनअखेरपर्यंत मुदतवाढ द्यावी

**स्वस्त धान्य दुकानादार संघटनेची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे मागणी**

● **कोपरगाव । वीरभूमी –**

जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानादारांना चालू महिन्याचे धान्य वितरण पूर्ण करण्यासाठी जूनअखेरपर्यंत मुदतवाढ द्यावी, अशी मागणी अहिल्यानगर स्वस्त धान्य व रॉकेल परवानाधारक असोसिएशनच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.



यासंदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील सुमारे ८० टक्के स्वस्त धान्य दुकानांमध्ये अद्याप धान्य पोहोचलेले नाही. शासनाने चालू महिन्यातील धान्य वितरणासाठी १५ जूनपर्यंत मुदत दिली होती. मात्र, अनेक दुकानांमधून अद्याप धान्य वितरण पूर्ण झालेले नसल्याने लाभार्थी धान्यापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे धान्य वितरणासाठी जूनअखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, फेब्रुवारी महिन्यापासून प्रलंबित असलेले कमिशन तातडीने अदा करावे, मे २०२१ व डिसेंबर २०२२ मध्ये धान्य दुकानादारांकडून भरून घेतलेली धान्याची रक्कम परत करण्यात यावी, तसेच एप्रिल २०२६ मधील राहिलेले धान्य वितरण करण्यासाठी चालू महिन्यात पॉस मशिनवर आवश्यक पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शासनाने वरील मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून स्वस्त धान्य दुकानादारांना न्याय द्यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सतीश हिरडे पाटील, विभागीय अध्यक्षा मीनाताई कळकुंबे, शिवाजीराव मोहिते, सुरेशराव नागरे, दिलीप वांडेकर, संभाजी ढाकणे, पोपटराव पाखरे, खंडू भुकण, सुग्रीव वायकर, बजरंग कदम, गोवर्धन वागसकर, बाबासाहेब चिखलठाणे, विश्वनाथ पंधरकर, अरुण वाळके, विश्वास जाधव, अशोक जायभाय, उत्तमराव चरमळ, बन्सी असवले, माणिक जाधव, सुधाकर निकम, बाबासाहेब ढाकणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## सुस्थितीतील वीज मीटर बदलण्याची सक्ती थांबवा; ग्राहकांना निवडीचा अधिकार द्या

**अखिल भारतीय ग्राहक पंचायत । स्मार्ट मीटर सक्तीविरोधात वीज ग्राहकांनी जागरूक राहण्याचे बाळासाहेब औटी यांचे आवाहन**

● **पारनेर । वीरभूमी–**

महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्याबाबत वीज ग्राहकांना एसएमएस व इतर माध्यमांतून सूचना दिल्या जात असून, ग्रामीण भागातील ग्राहकांमध्ये संभ्रम व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुस्थितीत असलेले आणि अचूक रीडिंग देणारे विद्यमान मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करू नये, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, मध्य महाराष्ट्र प्रांतचे अध्यक्ष बाळासाहेब औटी यांनी केली आहे.

वीज ग्राहक हा सेवाग्राही असून त्याला योग्य माहिती, पारदर्शकता आणि निवडीचा अधिकार मिळणे आवश्यक आहे. वीज कायदा २००३, ग्राहक संरक्षण कायदा २०१९ तसेच संविधानिक अधिकारांचा विचार करूनच कोणतीही प्रक्रिया राबविणे गरजेचे असल्याचे औटी यांनी स्पष्ट केले.



स्मार्ट मीटर तंत्रज्ञानाबाबत ग्राहकांना पुरेशी माहिती, सुरक्षा व्यवस्था, तपासणी सुविधा, डेटा संरक्षण आणि भविष्यातील आर्थिक परिणाम याबाबत स्पष्टता देणे आवश्यक आहे. ग्राहकांच्या शंकांचे समाधान न करता सक्तीची प्रक्रिया राबविणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

विशेषतः स्मार्ट मीटर नादुरुस्त झाल्यास त्याची निष्पक्ष तपासणी करण्यासाठी मान्यताप्राप्त प्रयोगशाळा, पारदर्शक व्यवस्था आणि ग्राहक संरक्षणाची हमी आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

बाळासाहेब औटी म्हणाले, वीज ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणे ही ग्राहक पंचायतीची भूमिका आहे. तंत्रज्ञानाला विरोध नाही; मात्र ग्राहकांच्या संमतीशिवाय आणि पुरेशी माहिती न देता कोणतीही सक्ती मान्य केली जाणार नाही. ग्राहकांच्या हक्कांसाठी लोकशाही आणि कायदेशीर मार्गाने संघर्ष करण्यात येईल.

### वीज ग्राहकांनी काय करावे?

- सध्याचे मीटर व्यवस्थित कार्यरत असून योग्य रीडिंग देत असल्यास त्याची नोंद ठेवावी.
- स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी महावितरणकडून लेखी माहिती व स्पष्टीकरण मागावे.
- कोणतीही सक्ती किंवा दबाव निर्माण झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज सादर करावा.
- आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून कोणतीही भूमिका शांततामय आणि कायदेशीर मार्गाने मांडावी.
- अखिल भारतीय ग्राहक पंचायतेतर्फे सर्व वीज ग्राहकांना घाबरून न जाता जागरूक राहण्याचे, आपल्या हक्कांची माहिती घेण्याचे आणि कोणतीही अडचण उद्भवल्यास ग्राहक संघटनांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# एस एस जी एम महाविद्यालयाकडून आमदार विवेक कोल्हे यांचा सत्कार

**रयतसेवेसाठी हक्काचा आमदार म्हणून प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील असणार : आ. विवेक कोल्हे**

● **कोपरगाव । वीरभूमी –**

शिक्षण क्षेत्रात वाढत्या बदलाच्या पार्श्वभूमीवर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी घालून दिलेल्या मूल्यांवर आधारित रयत शिक्षण संस्था समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचविण्याचे कार्य करत आहे. एस एस जी एम महाविद्यालयाशी माझा आगळा वेगळा ऋणानुबंध आहे.प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती हा शिक्षकांचा विद्यार्थी असतो त्यामुळे जनसेवेचे सामाजिक कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आमदार झाल्यानंतर होणारा हा सन्मान माझ्यासाठी विशेष असल्याचे प्रतिपादन आमदार विवेक कोल्हे यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव येथे विधानपरिषद सदस्य झाल्याबद्दल आ. विवेक कोल्हे यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. तसेच कल्पतरू नियतकालिक प्रकाशन समारंभात ते बोलत होते.

यावेळी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य संदीप वर्पे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य सुरेश बोळीज, माजी जिल्हा परिषद सदस्य महेंद्रशेठ काले, अश्वमेधचे प्रमुख ज्ञानेश्वर वाकचौरे, शुक्राचार्य महाराज मंदिर ट्रस्ट अध्यक्ष बाळासाहेब आव्हाड, प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्यासह सर्व उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना आ. कोल्हे म्हणाले की, कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असलेली व्यक्ती ही शिक्षकांचीच विद्यार्थिनी किंवा विद्यार्थी असते. त्यामुळे शिक्षकांच्या हस्ते होणारा सन्मान हा माझ्यासाठी विशेष अभिमानाचा क्षण आहे. एस.एस.जी.एम. कॉलेजशी माझे जुने ऋणानुबंध असून रयत शिक्षण संस्थेतील माझ्या प्रवासाची सुरुवात याच महाविद्यालयातून झाली असल्याचे त्यांनी सांगितले.रयत शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक शरद पवार यांची अलीकडेच भेट घेतल्याचा उल्लेख करताना त्यांनी संस्थेविषयी असलेली त्यांची तळमळ अधोरेखित केली. स्वर्गीय शंकरराव कोल्हे आणि स्वर्गीय शंकरराव काळे यांनी संस्थेच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचेही त्यांनी नमूद केले. शिक्षकांच्या समोर बदलत्या युगात अनेक आव्हाने आणि संधी आहेत त्या दृष्टीने काम करण्याची आवश्यकता आहे.

महाविद्यालयाच्या विकासासाठी आवश्यक असलेले सर्व सहकार्य करण्याची ग्वाही देताना आ. कोल्हे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन लाभत असल्याने त्यांच्या सहकार्याने रयत शिक्षण संस्थेच्या कोणत्याही शाखेसमोरील प्रश्न सोडविण्यासाठी एक रयत सेवक म्हणून मी सदैव कटिबद्ध राहणार आहे, कारण आता तुमचा हक्काचा माणूस सत्तेत आहे त्यामुळे हक्काने आपण प्रश्न सांगा असे म्हणाले. ॲड. संदीप वर्पे यांना देखील रयतचा सेवा वारसा लाभला आहे त्यामुळे त्यांच्या माध्यमातून महाविद्यालयाची अधिक प्रगती व्हावी अशी भावना मांडली.



ॲड. संदीप वर्पे यांनी एक हक्काचा आमदार आपल्याला लाभला आहे.सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी महत्वाचे नेतृत्व म्हणून आ. विवेक कोल्हे यांची मदत होणार आहे. माजी मंत्री शंकरराव कोल्हे, बिपीनदादा कोल्हे यांचा माझ्या राजकीय जडणघडणीत मोठा वाटा आहे. शरदचंद्र पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेत राजकीय जोडे बाजूला ठेवत काम करण्याची सूचना आहे.आपल्या व्यवस्थापन समितीचे सदस्य म्हणून आ. विवेक कोल्हे यांच्यासारखा सरकार दरबारी आपले प्रश्न सोडवण्यासाठी हक्काचा माणूस आता आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

## SPOT NEWS



## श्रमिकनगरच्या श्री मार्कंडेय शाळेत औक्षणाने विद्यार्थ्यांचे स्वागत

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक, माध्यमिक व बालक मंदिर विद्यालयात विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण आणि पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसाठी आकर्षक सजावट, औक्षण, चॉकलेट वाटप, मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण तसेच विविध मनोरंजक खेळांची व्यवस्था करण्यात आल्याने शाळा परिसर आनंद, उत्साह आणि नव्या उमेदीनं फुलून गेला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेच्या प्रवेशद्वारावर फुग्यांनी सजलेली आकर्षक स्वागत कमान उभारण्यात आली होती. संपूर्ण परिसर रंगीबेरंगी रांगोळ्यांनी सजविण्यात आला होता. प्रत्येक वर्गात फुग्यांची आकर्षक सजावट करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणाचा अनुभव मिळाला. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शालेय विद्यार्थी, शिक्षक आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारंपरिक औक्षण करून स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी विविध खेळांची व्यवस्था करण्यात आली होती. जम्पिंग पॅड आणि एअर स्लाइड यांसारख्या खेळांवर विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळालेल्या या अनोख्या स्वागतामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आपुलकी आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. समग्र शिक्षा अभियानांतर्गत सर्व विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकांचे मोफत वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना चॉकलेट्स देऊन त्यांच्या आनंदात भर घालण्यात आली. शाळेने उभारलेल्या आकर्षक सेल्फी पॉइंटवर विद्यार्थ्यांनी आपल्या मित्र-मैत्रिणी आणि पालकांसमवेत छायाचित्रे काढत या संस्मरणीय दिवसाच्या आठवणी जपल्या. या स्वागत सोहळ्यासाठी महापालिका शिक्षण मंडळाचे सावेडी केंद्र समन्वयक अरुण पालवे यांच्यासह विविध मान्यवर व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शशीकांत गोरे यांनी प्रास्ताविकातून शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली. हा स्वागत सोहळा यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पंचशील विद्या मंदिरात शाळेच्या पहिल्या दिवसाचा उत्साह

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक भूमीत वसलेल्या पंचशील विद्या मंदिर प्राथमिक शाळेत शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तके आणि शालेय बॅगचे वाटप करून त्यांचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शहर पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, संस्थेचे अध्यक्ष सुमेध गायकवाड, ज्येष्ठ नेते अशोकराव गायकवाड, विश्वस्त प्रा. जयंत गायकवाड, रवींद्र कांबळे, सुजाता गायकवाड, सागर ठोकळ, सचिन शेलार, मुख्याध्यापक शेखर उंडे, श्रीमती गोसावी मॅडम, श्रीमती वांगणे मॅडम, श्रीमती शिरसाठ मॅडम, ऊकर्डे सर, श्री साबळे सर, श्रीमती तिवारी मॅडम तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष सुमेध गायकवाड यांनी प्रास्ताविकातून संस्थेची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, सन १९३६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या संस्थेला भेट दिली होती. त्या भेटीचा लेखी पुरावा उपस्थितांना दाखविण्यात आला. तसेच संस्थेच्या कार्याचा आढावा घेत प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना शहर पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे म्हणाले, प्रत्येक धर्मात नवीन वर्ष साजरे केले जाते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी जून महिना हा नव्या शैक्षणिक वर्षाचा आनंदोत्सव असतो. उन्हाळी सुट्ट्यांचा आनंद घेतल्यानंतर विद्यार्थी नव्या उत्साहाने शाळेत येतात.

# विद्यार्थ्यांसाठी बस अडवावी लागली तरी मागे हटणार नाही

**आ. आशुतोष काळे । एसटी प्रशासनाला सूचक इशारा । कोपरगाव आगारासाठी सव्वा वर्षात १५ नवीन बस उपलब्ध**

**● कोपरगाव । वीरभूमी –**

राज्यात शाळा व महाविद्यालये सुरू झाल्यानंतर ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी एसटी बसने प्रवास करतात. मात्र, लांब पल्ल्याच्या बस छोट्या बसथांब्यांवर थांबत नसल्याने तसेच बसची संख्या कमी असल्याने विद्यार्थ्यांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. बसमध्ये जागा उपलब्ध असूनही विद्यार्थ्यांना प्रवासाची संधी नाकारणे योग्य नसून, अशी परिस्थिती कायम राहिल्यास विद्यार्थ्यांच्या हितासाठी मला बस अडवावी लागेल, असा सूचक इशारा आमदार आशुतोष काळे यांनी एसटी प्रशासनाला दिला आहे.



आमदार आशुतोष काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कोपरगाव बस आगारात नव्याने दाखल झालेल्या पाच 'राजमाता जिजाऊ' बसचे लोकार्पण सोमवारी (दि. १५) त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

ते म्हणाले की, कोपरगाव बस आगारातील बसांची संख्या अपुरी असल्याने काही मार्गांवरील फेऱ्या अनियमित झाल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. यासंदर्भात परिवहन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्यामुळे यापूर्वी १० नवीन 'लालपरी' बस आणि आता पाच 'राजमाता जिजाऊ' बस अशा एकूण १५ नवीन बस कोपरगाव आगाराला सव्वा वर्षात मिळाल्या आहेत.

या नव्या बसेसमुळे विस्कळीत झालेली वाहतूक व्यवस्था पूर्ववत होण्यास मदत होणार असली, तरी कोपरगाव आगारासाठी आणखी बस उपलब्ध करून देण्यासाठी आपला पाठपुरावा सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच कोपरगाव आगारातील चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण झाल्यानंतर इलेक्ट्रिक बसची मागणी करण्यात आली असून, त्या बसदेखील लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होतील, अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी डेपो व्यवस्थापक अमोल बनकर, वाहतूक निरीक्षक अमित हांपे, आगार लेखाधिकारी मिलिंद कोपरे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, जिनिंग प्रेसिंग सोसायटीचे अध्यक्ष गोरक्षनाथ जामदार, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, हाजी मेहमूद सय्यद, विजय त्रिभुवन, इम्तियाज अत्तार, वाल्मिक लहिरे, शैलेश साबळे, सोमेश आढाव, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक विरेन बोरावके, रमेश गवळी, बाळासाहेब आढाव, अजीज शेख, फकीर कुरेशी, दिनकर खरे, सचिन ठोळे, नवाज कुरेशी, डॉ. तुषार गलांडे, शुभम काळे, मनोज नरोडे, धनंजय कहार, सागर फडे, मुकुंद भूतडा, नितेश बोरुडे, सागर आहेर, डॉ. अजय गर्जे, डॉ. आतिश काळे, संतोष मरसाळे, अशोक आव्हाटे, सचिन परदेशी, मुकुंद इंगळे, जावेद शेख, भाऊसाहेब भाबड, चंद्रकांत धोत्रे, राजेंद्र आभाळे, राजेंद्र खैरणार, संतोष दळवी, विकी चांदर, तन्मय साबळे, वैभव कानडे, हारुन शेख, फैय्याज, मयुरेश शिंदे, मयुर राऊत, बाबासाहेब शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत अल्पवयीन मुलीचा शोध; बेलवंडी पोलिसांची तत्पर कारवाई

**परभणीतून मुलीला ताब्यात घेऊन सुखरूप पालकांच्या स्वाधीन**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

'ऑपरेशन मुस्कान' अभियानांतर्गत बेलवंडी पोलिसांनी तत्पर कारवाई करत घरातून निघून गेलेल्या एका अल्पवयीन मुलीचा शोध घेऊन तिला सुखरूप पालकांच्या ताब्यात दिले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा तालुक्यातील सुरेगाव येथील एका अल्पवयीन मुलीने ४ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास कोणालाही न सांगता राहते घर सोडले होते. ती परत न आल्याने तिच्या पालकांनी बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २१५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) अंतर्गत अपहरणाचा गुन्हा ६ जून २०२६ रोजी दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, 'ऑपरेशन मुस्कान' अभियानांतर्गत बेलवंडी पोलीस ठाण्याच्या पथकाने तांत्रिक माहिती तसेच गोपनीय बातमीदारांच्या मदतीने शोधमोहीम सुरू केली. या शोधमोहीमेदरम्यान १४ जून २०२६ रोजी संबंधित अल्पवयीन मुलीचा परभणी येथे शोध लागला. पोलिसांनी तिला ताब्यात घेतल्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तिच्या पालकांच्या स्वाधीन सुखरूपपणे सुपूर्द केले.

सदर प्रकरणी पुढील तपास सुरू असून आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने तसेच सहायक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक मोहन गाजरे, पोलीस हवालदार रवींद्र औटी, महिला पोलीस हवालदार अविंदा जाधव, पोलीस नाईक यश ठोंबरे आणि पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र बर्डे यांनी शोधमोहीम यशस्वीरीत्या पार पाडली.

## खून प्रकरणातील आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त

**श्रीगोंदा पोलिसांची कारवाई । आरोपी पोलीस कोठडीत**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या खून प्रकरणातील आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेले हत्यार जप्त करण्यात श्रीगोंदा पोलिसांना यश आले आहे.



याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५९५/२०२६ भारतीय न्यायसंहिता कलम १०३ अन्वये दाखल असलेल्या खून प्रकरणातील आरोपी विलास दादा गावडे (रा. पिसोरेखांड, ता. श्रीगोंदा) यास अटक करण्यात आली होती. आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली होती.

पोलीस कोठडीदरम्यान आरोपीची सखोल चौकशी करण्यात आली. त्यावेळी आरोपीने खून प्रकरणात वापरलेले हत्यार लपवून ठेवल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी मेमोरँडम पंचनाम्याद्वारे संबंधित हत्यार जप्त केले आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सचिन लिमकर तसेच पोलीस कॉन्स्टेबल संदीप शिरसाठ, राहुल मोढळे आणि शरद चौभे यांनी केली.

# मांडओहोळ धरण परिसरातील निर्बंधांमुळे हाताशी आलेली पिके धोक्यात

**शेतकरी आर्थिक संकटात; विशेष अनुदानाची मागणी, राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांचे प्रशासनाला निवेदन**

**● पारनेर । वीरभूमी–**

मांडओहोळ धरण परिसरात अचानक लागू करण्यात आलेल्या पाणी वापराच्या निर्बंधांमुळे कर्जुले हर्या, मानेवाडी, सावरगाव, काळेवाडी, गोडसेवाडी, शिंदेवाडी, गुरवेवाडी आणि वासुंदे येथील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. या निर्बंधांमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने विशेष आर्थिक अनुदान देण्यात यावे तसेच जाचक निर्बंधांचा पुनर्विचार करण्यात यावा, अशी मागणी निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी व टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते अमोल उगले यांनी पारनेरचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मांडओहोळ धरण परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर टोमॅटो, मिरची यांसारख्या नगदी पिकांची लागवड करतात. या पिकांसाठी शेतकऱ्यांनी खते, बियाणे, औषधे, ठिबक सिंचन आणि मशागतीवर लाखो रुपयांची गुंतवणूक केली आहे. मात्र, प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता पाणी उपशावर निर्बंध घातल्यामुळे उभी पिके धोक्यात आली असून कोट्यवधी रुपयांच्या नुकसानाची भीती व्यक्त केली जात आहे. आधीच नैसर्गिक संकटे आणि बाजारभावातील चढ-उतारामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे या निर्णयामुळे कंबरडे मोडल्याची भावना व्यक्त होत आहे.

यासंदर्भात प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी भोंद्रे गावचे सरपंच अभिजित झावरे, वारणवाडीचे सरपंच संजय काशीद, सामाजिक कार्यकर्ते अशोक खैरे, निलेश पवार, युवराज पाटील खिलारी, सुरेश झावरे, ग्रामपंचायत सदस्य डॉ. आकाश झावरे, माजी सरपंच अनिल तांबडे, पियुष कोकाटे, सचिन वाफारे, मयूर आंधळे, विवेक शिंदे, देसवडे येथील संपत फटांगरे यांच्यासह मांडओहोळ परिसरातील शेतकरी तसेच निलेश लंके प्रतिष्ठान आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संबंधित विभागाने तातडीने पिकांचे पंचनामे करून शासनाकडे मदतीचा प्रस्ताव पाठवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

> कोणतीही पूर्वसूचना न देता मांडओहोळ धरण परिसरात लागू करण्यात आलेल्या निर्बंधांमुळे शेतकऱ्यांच्या कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीवर पाणी फिरण्याची भीती निर्माण झाली आहे. पिकांना पाणी न मिळाल्यास टोमॅटो व मिरचीची उभी पिके जळून खाक होतील. प्रशासनाने तातडीने पिकांचे पंचनामे करून विशेष अनुदान मंजूर करावे आणि या जाचक निर्बंधांचा पुनर्विचार करून बळीराजाला तातडीने दिलासा द्यावा, हीच आमची मागणी आहे.
>
> – **अमोल उगले,** टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गट

# सुवर्णयश! बाबूजी आव्हाड महाविद्यालयाच्या ९४ विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत निवड

**पोलीस, भारतीय सैन्यदल आणि विविध शासकीय विभागांत भरती । १५ वर्षांत पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मिळवून दिली यशाची संधी**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातही विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत दाखल करण्याची सुवर्ण परंपरा कायम राखली आहे. यावर्षी तब्बल ९४ विद्यार्थ्यांची पोलीस, भारतीय सैन्यदल तसेच विविध शासकीय सेवांमध्ये निवड झाली आहे.

ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना दर्जेदार उच्च शिक्षण मिळावे आणि त्यांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या दूरदृष्टीतून थोर स्वातंत्र्यसैनिक तथा माजी आमदार स्व. बाबूजी आव्हाड यांनी या महाविद्यालयाची स्थापना केली. आज बाबूजी आव्हाड महाविद्यालय ग्रामीण भागातील ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षणासोबतच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे गावपातळीवरील विद्यापीठ ठरत आहे.

गेल्या १५ वर्षांत महाविद्यालयातील ग्रंथालय, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, करिअर कट्टा तसेच भव्य क्रीडांगण आणि उपलब्ध करून दिलेल्या मोफत क्रीडा सुविधांचा लाभ घेत पाच हजारांहून अधिक विद्यार्थी पोलीस दल, भारतीय सैन्यदल, एमपीएससी तसेच विविध शासकीय सेवांमध्ये दाखल झाले आहेत.



अभ्यासिकेत नियमित अभ्यास, वैयक्तिक मार्गदर्शन, प्रश्नसंचांचा सराव आणि क्रीडांगणावर शारीरिक चाचणीची तयारी यामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे. यावर्षी पोलीस व खात्यांतर्गत पोलीस उपनिरीक्षक पदांसाठी ५६, भारतीय सैन्यदलात ३१, विविध शासकीय आस्थापनांमध्ये ५, तर सेट-नेट परीक्षेत २ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून आणि प्राचार्य डॉ. बबन चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी तालुक्यातील गरीब, होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उभारण्यात आले आहे. ग्रंथालयात स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक पुस्तके व मासिके, तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांसाठी ४०० मीटर धावपट्टी, इनडोअर स्टेडियम, गोळाफेक व उंचउडीसाठी स्वतंत्र मैदान अशा सुविधा निशुल्क उपलब्ध करून दिल्या जातात.

पोलीस, सैन्यदल आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करताना ग्रामीण भागातील गरीब व ऊसतोडणी कामगारांच्या पाल्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती, पदभरती प्रक्रियेतील अनियमितता, वाढती स्पर्धा आणि महागड्या अकॅडमींमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करत विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात अभ्यास करताना आर्थिक अडचणींसोबतच वेळेवर भरती प्रक्रिया न झाल्यास आणि वाढत्या वयाच्या पार्श्वभूमीवर अनेक विद्यार्थी नैराश्याच्या गर्तेत जातात. अशा वेळी महाविद्यालय त्यांचे समुपदेशन करण्याबरोबरच आवश्यक आर्थिक मदतही करते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना नव्या उमेदीने प्रयत्न करता येतात आणि तीन-चार वर्षांच्या अथक परिश्रमानंतर ते पोलीस दल व भारतीय सैन्यदलात भरती होतात.

### 'शिक्षणासोबत स्पर्धा परीक्षांची तयारी हेच महाविद्यालयाचे ध्येय' : अभय आव्हाड

■ बाबूजी आव्हाड महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणासोबतच व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्यासाठी तसेच विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विविध शासकीय सेवांमध्ये प्रवेश मिळवावा, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थी घडविण्याचे काम केले जाते.

– **अभय आव्हाड,** अध्यक्ष, पार्थ विद्या प्रसारक मंडळ, पाथर्डी

### 'निशुल्क सुविधा आणि योग्य मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना यश' : प्राचार्य डॉ. बबन चौरे

■ गरीब, गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी मागील १५ वर्षांपासून सुरू असलेले स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि करिअर कट्टा विद्यार्थ्यांना विविध निशुल्क सुविधा उपलब्ध करून देत आहेत. स्पर्धा परीक्षा केंद्र, भव्य क्रीडांगण आणि सुयोग्य मार्गदर्शनाच्या बळावर संपूर्ण महाराष्ट्रातून दरवर्षी मोठ्या संख्येने विद्यार्थी दृढनिश्चय आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर पोलीस, भारतीय सैन्यदल तसेच इतर शासकीय सेवांमध्ये भरती होत आहेत.

– **प्रा. डॉ. बबन चौरे**
प्राचार्य, बाबूजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी

या यशामागे स्पर्धा परीक्षा समन्वयक डॉ. किरण गुलदगड, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विजय देशमुख, विद्यार्थी समुपदेशक डॉ. अभिमन्यू ढोरमारे तसेच एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे यांचे मार्गदर्शन लाभले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# जिल्हा परिषद शाळांतील गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणार

## नगराध्यक्ष अभय आव्हाड । पाथर्डीतील पीएमश्री केंद्रीय शाळेत प्रवेशोत्सव, गणवेश व शैक्षणिक साहित्य वितरण उत्साहात

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डीसारख्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत अत्याधुनिक संगणक कक्ष, समृद्ध ग्रंथालय, आधुनिक खगोलशास्त्रीय प्रयोगशाळा, खेळासाठी मोठे मैदान, दर्जेदार क्रीडा साहित्य, डिजिटल शिक्षणासाठी इंटरक्टिव्ह बोर्ड आणि सुसज्ज इमारत अशा भौतिक सुविधांसह उत्कृष्ट शिक्षक व दर्जेदार शिक्षणातून साधलेली शैक्षणिक गुणवत्ता निश्चितच कौतुकास्पद आहे. इतर माध्यमांच्या शाळांच्या तुलनेत आपण कुठेही कमी पडू नये यासाठी शिक्षक घेत असलेले कष्ट विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करणारे आहेत. प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम झाला, तर भविष्यात कोणत्याही क्षेत्रात अडचण येत नाही. आजचा बालक हा उद्याचा प्रगतीशील भारताचा आणि शहराचा सुजाण नागरिक असणार आहे, असे प्रतिपादन नगराध्यक्ष अभयराव आव्हाड यांनी केले.

पाथर्डी येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय शाळा आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुली) येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२६ च्या प्रवेशोत्सवानिमित्त आयोजित गणवेश वाटप, पाठ्यपुस्तक वितरण तसेच अभय आव्हाड प्रतिष्ठान आणि नगरपरिषदेतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी अभयराव आव्हाड बोलत होते.

कार्यक्रमास नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, केंद्रप्रमुख सविता कुटे, उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे, ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, अमोल गर्जे, सुभाष बोरुडे, वंदना टेके, शारदा गर्जे, मुख्याध्यापिका नंदा तुपे, मुख्याध्यापक राजू गोल्हार, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुशिला खाटेर, काळोखे मॅडम, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रमेश मोरगावकर, हुमायून आतार, अविनाश मंत्री, अनिल खाटेर तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

प्रवेशोत्सवानिमित्त शाळेचा परिसर आकर्षक रांगोळ्या आणि पुष्पसजावटीने सजविण्यात आला होता. शाळेच्या पहिल्या दिवशी आलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, मिठाई आणि चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. चिमुकल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले, तर काही विद्यार्थ्यांचे लक्ष्मीच्या पावलांनी स्वागत करण्यात आले. फुगे, चॉकलेट आणि विविध उपक्रमांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी बालवाडीत २५ विद्यार्थ्यांनी, तर इयत्ता पहिलीत सुमारे ४० मुले आणि ३५ मुलींनी प्रवेश घेतला. शाळेच्या पटसंख्येनुसार ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना गणवेश, शूज, पाठ्यपुस्तके आणि अन्य शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. मध्यान्ह भोजनात विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजनही देण्यात आले. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून अभय आव्हाड प्रतिष्ठान, नगरपरिषद पाथर्डी आणि नगरसेवकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना वह्या, खेळाचे साहित्य आदींचे वितरण करण्यात आले. यावेळी शाळेत उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉइंटवर विद्यार्थी आणि पालकांनी छायाचित्रे काढून प्रवेशोत्सवाच्या आठवणी जतन केल्या.

यावेळी पुढे बोलताना अभयराव आव्हाड म्हणाले की, या शाळेने मागील काळात अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले असून, पोलीस महासंचालक महेश भागवत यांच्यासह अनेक मान्यवरांची नावे अभिमानाने घ्यावी लागतील. विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, हक्क व कर्तव्यांची जाणीव, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक



बांधिलकीची जडणघडण बालवयातच होणे आवश्यक आहे. या शाळेच्या माध्यमातून उत्तम नागरिक घडावेत यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. शाळेची गुणवत्ता आणि सकारात्मक वातावरण पाहता इतर माध्यमांच्या शाळांमधील अनेक विद्यार्थी पुन्हा जिल्हा परिषद शाळांकडे वळत आहेत, ही बाब निश्चितच शाळेसाठी भूषणावह असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षिका अनुराधा तरवडे, ज्योती जाधव, शिला नांगरे, भावना देवरे, मंगल कीर्तने, मंदा पालवे, सुरेखा बडे, छाया चंदनशिव, अर्चना खाडे, मनीषा फटांगरे, लता भंडारे आणि जायभाय सर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका नंदा तुपे यांनी केले. सूत्रसंचालन भावना देवरे यांनी केले, तर आभार शिला नांगरे यांनी मानले.

# ढोल-ताशा, बँडच्या गजरात इयत्ता पाचवीच्या नवागतांचे स्वागत

## चापडगाव विद्यालयात प्रवेशोत्सवानिमित्त मिरवणूक । विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, पेनचे वाटप

**● शेवगाव । वीरभूमी–**

कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त बाजारतळ ते विद्यालय या मार्गावर ढोल–ताशा आणि बँडच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पवृष्टी व औक्षण करून स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते रोहिदास पातकळ हे होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, विठ्ठल गमे सर, वाल्हेकर भाऊसाहेब, सखाराम घावटे, बबन गायकवाड, भिवाजी पातकळ, पांडुरंग तेलोरे, पंडित नेमाणे, कल्याणराव नेमाणे, भारतभाऊ गायकवाड, सुभाष लोहकरे,



### ‘महिन्यातून एक तास शाळेसाठी द्या’ : प्राचार्य संपत दसपुते यांचे पालकांना आवाहन

■ प्राचार्य संपत दसपुते यांनी पालकांना आवाहन करताना सांगितले की, महिन्यातून किमान एक तास शाळेत येऊन आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घ्यावी. तसेच महिन्यातून दोन वेळा आमच्या शाळेतील शिक्षक आपल्या पाल्याच्या प्रगतीची माहिती दूरध्वनीद्वारे पालकांपर्यंत पोहोचवतील.

कल्याणराव पातकळ, भारत लोहकरे, किरण पातकळ, कैलासराव गोरे, राजेंद्र भूसे, सत्तारभाई शेख, दादासाहेब शिरसाठ, गणेश तेलोरे, निलेश गायकवाड, रविंद्र तानवडे, अण्णासाहेब गोरे, अशोक पातकळ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य संपत दसपुते, ज्येष्ठ शिक्षक सर्जेराव निकाळजे, सखाराम घावटे व रोहिदास पातकळ यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. नियमित उपस्थिती, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, पेन, चॉकलेट तसेच मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्सुकता दिसून येत होती. प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आत्मीयता निर्माण होऊन नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी वातावरणात झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील जायभाये यांनी केले. अक्षय पुरनाळे यांनी अनुमोदन केले, तर सूत्रसंचालन प्रा. दादासाहेब ज्योतिक यांनी केले. प्रभाकर मराठे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# करंदी जिल्हा परिषद शाळेत नवागतांचे उत्साहात स्वागत

## तालुकास्तरीय ‘शाळा गौरव पुरस्काराने’ गावकऱ्यांचा आनंद द्विगुणित

**● पारनेर । वीरभूमी–**

राज्यात १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ झाला असून, पारनेर तालुक्यातील करंदी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी चिमुकल्यांच्या किलबिलाटाने परिसर दुमदुमून गेला. याच आनंददायी वातावरणात शाळेला प्राप्त झालेल्या ‘तालुकास्तरीय शाळा गौरव पुरस्काराचा’ विशेष सन्मान सोहळाही पार पडला.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या छोटेखानी कार्यक्रमात शाळेला मिळालेला



तालुकास्तरीय पुरस्कार हा ग्रामस्थांसाठी अभिमानाचा विषय ठरला.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा संजनाताई उघाडे, करंदी गावचे सरपंच भास्कर गव्हाणे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य संतोष मोहिते, युवा नेते लखन ठाणगे, समितीचे उपाध्यक्ष शिवाजी ठाणगे, विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष बबन चौधरी, युवा नेते विलास उघाडे तसेच सलीम इनामदार आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांनी मुख्याध्यापक रोकडे सर, थोरात सर, सुंबे सर आणि घुले मॅडम यांच्या कार्याचा विशेष गौरव केला. केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता शिक्षकांच्या अथक परिश्रमामुळे शाळेचा सर्वांगीण विकास साधला गेला असून, त्यांच्या दूरदृष्टी आणि जिद्दीमुळेच करंदीची जिल्हा परिषद शाळा तालुका स्तरावर नावारूपास आल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

उपस्थित ग्रामस्थांनीही शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. मराठी शाळांचे बळकटीकरण आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ही काळाची गरज आहे, असे मत सरपंच भास्कर गव्हाणे यांनी व्यक्त केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे सहकार्य ग्रामस्थांकडून कायम मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. शिक्षकांनी याच जिद्दीने आणि उत्साहाने कार्य सुरू ठेवावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन शालेय समितीच्या वतीने करण्यात आले. शाळेतील या उत्सवी वातावरणामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यातील नाते अधिक दृढ झाले असून, नव्या शैक्षणिक उमेदीसह करंदी जिल्हा परिषद शाळा नव्या वाटचालीस सज्ज झाली आहे.

# खाजगी शाळांकडून पालकांची आर्थिक पिळवणूक; शिक्षण विभागाच्या दिरंगाईविरोधात उपोषण सुरू

## गणवेश व शालेय साहित्य खरेदीची सक्ती थांबविण्याची ‘भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश’ संघटनेची मागणी

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील काही खाजगी शाळांमध्ये शालेय साहित्य व गणवेशाची सक्तीने तसेच चढ्या दराने विक्री करून पालकांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कथित प्रकाराविरोधात ‘भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश’ संघटनेने आक्रमक भूमिका घेत शिक्षण विभागाच्या दिरंगाईचा निषेध नोंदवत सोमवार (दि. १५ जून) पासून तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले




आहे.

यासंदर्भात संघटनेचे जिल्हा संघटक भानुदास पांडुरंग साळवे यांनी तहसीलदार व गटशिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही खाजगी शाळा प्रशासनाच्या नियमांना धाब्यावर बसवून पालकांना शैक्षणिक साहित्य व गणवेश शाळेतूनच खरेदी करण्यास भाग पाडत आहेत. त्यामुळे पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून त्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे.

या गंभीर विषयाकडे वारंवार लक्ष वेधूनही आणि तक्रारी करूनही शिक्षण विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. वरिष्ठ स्तरावरून सूचना देण्यात आल्याचे सांगितले जात असतानाही प्रत्यक्षात कारवाई होत नसल्याने शिक्षण विभाग आपल्या कर्तव्यात कसूर करत असल्याचा आरोप साळवे यांनी केला आहे.

१५ जून २०२६ पर्यंत या कथित लूटमारीवर कायमस्वरूपी बंदी घालावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कारवाई करावी आणि अशा प्रथांना पाठीशी घालू नये, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

या निवेदनाच्या प्रती शिक्षणाधिकारी (जिल्हा परिषद, अहिल्यानगर), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, पंचायत समिती, पालकमंत्री, स्थानिक आमदार तसेच पोलीस निरीक्षक यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. या प्रकरणावर प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

# शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन

## आ. काशिनाथ दाते । पळशी आश्रमशाळेत प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील पळशी येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सव व नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभास पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

यावेळी नवागतांसह सर्व विद्यार्थ्यांचे आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले. नव्या स्वप्नांसह शाळेच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील अपेक्षा यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

याप्रसंगी बोलताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले, शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा जबाबदार नागरिक आणि देशाचा कर्तृत्ववान शिल्पकार असतो. त्यामुळे शिक्षणासोबत संस्कार, शिस्त आणि मूल्यांची जोपासना करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

आ. दाते यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर ती साकार करण्याचा संदेश दिला. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जिज्ञासा आणि सामाजिक जाणीवा निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी युवती राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षा संध्याताई सोनवणे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी अंबादास बागुल, विस्तार अधिकारी विनित लाळगे, मुख्याध्यापक हिंगडे सर, मृणाल ओव्हाळ, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य लहुजी मधे, सरपंच प्रकाश राठोड, गणेश हाके, गणेश शिंदे, संपत जाधव, सुभाष गांधी, नंदुशेठ शिंदे, सखाराम नवले, अमोल रोकडे, उमाजी मधे, काकासाहेब वारे, उपसरपंच नवनाथ आगिवले, संदीप गायकवाड, शिक्षकवृंद, पालक आणि नागरिक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांची गुणवत्ता हीच शाळेची खरी ओळख : आमदार आशुतोष काळे

## गुलाब पुष्प देत आमदार आशुतोष काळेंनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत । कोळपेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत रंगला प्रवेशोत्सव

**● कोपरगाव । वीरभूमी–**

प्राथमिक शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया असून या टप्प्यात मिळालेले शिक्षण आणि संस्कार विद्यार्थ्यांना आयुष्यभर उपयोगी पडतात. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण करून त्यांची बौद्धिक क्षमता विकसित करावी. कोणत्याही शाळेची ओळख केवळ भव्य इमारती, आधुनिक सुविधा किंवा शिक्षकांच्या संख्येवरून होत नसते तर विद्यार्थ्यांची गुणवत्ता हीच त्या शाळेची खरी ओळख असते असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ च्या पहिल्या दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळपेवाडी येथे नवीन विद्यार्थ्यांचे आमदार आशुतोष काळे यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. यावेळी त्यांनी शिक्षक, पालक विद्यार्थ्यांशी, संवाद साधला.याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, यशस्वी आयुष्याचे धडे गिरवण्यासाठी ज्ञानार्जनाच्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या निरागस चिमुकल्यांसाठी शाळेचा पहिला दिवस हे पहिले महत्त्वाचे पाऊल असते.हा पहिला दिवस प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील संस्मरणीय क्षण असतो.या दिवसापासूनच ज्ञान, संस्कार आणि यशाच्या प्रवासाला सुरुवात होत असते. आजचा विद्यार्थी उद्याचा चांगला नागरिक झाला पाहिजे ह्या दृष्टीकोनातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना घडवावे. शिष्यवृत्ती परीक्षा ही शाळेच्या बौद्धिक गुणवत्तेचे मोजमाप करणारी कसोटी असते. शिष्यवृत्ती परीक्षा तसेच विविध स्पर्धा आणि उपक्रमांमधील विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश यावरून शाळेची गुणवत्ता अधोरेखित होवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीतूनच शाळेची प्रतिष्ठा वाढत असते.कोळपेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांचा पट टिकून आहे हि अभिमानास्पद बाब असून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी




शैक्षणिक भौतिक गोष्टींना निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचेही वाटप करण्यात आले तसेच शाळेचे मुख्याध्यापक पुंडलिक सोनवणे यांनी शाळेला दिलेला प्रिंटर आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते शाळेला सुपूर्द करण्यात आला. यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सूर्यभान कोळपे, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे संचालक शकील पटेल, सरपंच सौ.चंद्रकलाताई कोळपे, सागर कोळपे, आदिनाथ कोळपे, अनिल कोळपे, महेश कोळपे, नंदकिशोर कोळपे, केंद्र प्रमुख पंडोरे, ग्रामविकास अधिकारी सय्यद तसेच शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> आपण सर्व मराठी भाषा बोलतो हे आपले भाग्य आहे. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि अस्मितेची ओळख आहे. आजच्या आधुनिक युगात दैनंदिन व्यवहारात अनेक इंग्रजी शब्दांचा वापर होत असला, तरी मराठी भाषेचा अभिमान बाळगून मराठी भाषेला प्राधान्य देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मराठीचा अभिमानाने वापर करणे हेच भाषेचे खरे संवर्धन आहे.
>
> **– आमदार आशुतोष काळे**